अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे,

**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,बारामती.**

# NOTICE

नोटीस क्र – 55 दि. ०२/०५/२०२२

## कनिष्ठ महाविद्यालय

## इ. १२ वी प्रवेश प्रक्रियेबाबत महत्त्वाची सूचना

शै. वर्ष २०२१–२२ मधील इ. ११ वी मध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे महाविद्यालयातर्फे हार्दिक हार्दिक अभिनंदन!

शै. वर्ष २०२२–२३ मधील इ. १२ वी साठीची प्रवेशप्रक्रिया **सोमवार दि. ०९/०५/२०२२ ते शनिवार दि. १४/०५/२०२२** या कालावधीमध्ये ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. तरी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी खालील नियमांचे तंतोतंत पालन करुन दिलेल्या मुदतीत आपला प्रवेश निश्चित करुन प्रशासनास सहकार्य करावे.

१) विद्यार्थ्यांना दि. ०६/०५/२०२२ पासून विद्यार्थी ग्राहक भांडारामध्ये प्रवेशासाठीची माहितीपुस्तिका उपलब्ध होईल. विद्यार्थ्यांनी माहितीपुस्तिकेतील पान नं. १ वरील **युजरनेम व पासवर्ड** (Username& Password) घेऊन ऑनलाईन प्रवेश निश्चित करावा. तसेच सदर युजरनेम व पासवर्ड गोपनीय ठेवावा.

२) महाविद्यालयाच्या **www.tccollege.org** या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) जाऊन आपल्या प्रवेश अर्जाची संपूर्ण माहिती भरावी. प्रवेश अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी **'प्रवेशप्रक्रिया 'फ्लो'चार्टचा'** वापर करावा

३) इ. ११ वी कला, वाणिज्य व एमसीव्हीसी शाखेतील विद्यार्थ्यांनी आपले इ. ११ वीचे असणारे विषय घेऊन इ. १२ वीचा प्रवेश निश्चित करावा.

४) इ. ११ वी शास्त्र अनुदानित तुकडीमधील ज्या विद्यार्थ्यांना गणित अथवा जीवशास्त्र विषय सोडून भूगोल विषय घ्यावयाचा आहे त्यांनी **दि. ०६/०५/२०२२ व ०७/०५/२०२२** या कालावधीत **भूगोल विषय गुणवत्ता यादीसाठी** अर्ज द्यावयाचे आहेत. गुणवत्ता यादीनुसार **गणित व भूगोल (MG)** या गटासाठी १२० विद्यार्थी आणि **जीवशास्त्र व भूगोल (BG)** या गटासाठी १२० विद्यार्थी निश्चित केले जातील. उर्वरित सर्व विद्यार्थ्यांनी अनिवार्यत: इ. ११ वीचे विषय घेऊन आपला प्रवेश निश्चित करावा.

५) इ. ११ वी शास्त्र विनाअनुदानित कॉम्प्युटर सायन्स (C.S.), इलेक्ट्रॉनिक्स (Ele.), फुड सायन्स अॅन्ड टेक्नॉ. (Food Sci.) विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांनी थेट प्रवेश घ्यावा.

६) इ. ११ वी शास्त्र विनाअनुदानित माहिती तंत्रज्ञान (I.T.) तुकडीतील विद्यार्थ्यांनी विषय निवडताना गणित किंवा जीवशास्त्र विषय सोडून भूगोल विषय घ्यावयाचा असल्यास योग्य तो पर्याय निवडून आपला प्रवेश निश्चित करावा. तसेच विषय बदलावयाचा नसल्यास थेट प्रवेश घ्यावा.

७) ॲडमिशन फॉर्म भरल्यावर आपल्या मोबाईलला मॅसेज येईल त्यात आलेल्या चलन नंबर वरुन **Online** पैसे भरावेत. त्यानंतर रिसिट काढून घ्यावी तेव्हाच ॲडमिशन फॉर्मचीही पाठपोठ प्रिंट काढून ठेवावी.

८) विद्यार्थ्यांसाठी ग्रंभालय विभागाात ऑनलाईन ॲडमिशन सुविधा मोफत उपलब्द करुन देण्यात आली आहे, त्याचा जास्तीत विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.

❖ **प्रवेश अर्ज महाविद्यालयात दि. ०२/०६/२०२२ पासून प्रशासन भवन येथे जमा करावेत व पोहोच घ्यावी.**

❖ **प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे –**

१) इ .११ वीचे गुणपत्रक झेरॉक्स प्रत मूळ गुणपत्रकावरुन तपासून मूळ गुणपत्रक परत केले जाईल.

२) फक्त मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी जातीच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत जोडावी.

३) ई.बी.सी./पी.टी.एफ./एस.टी.एफ. फी सवलतीचा संपूर्ण भरलेला सही शिक्क्या निशी अर्ज.

४) आधार कार्डची झेरॉक्स प्रत.

५) अलिकडच्या काळात काढलेले आयडेंटीटी कार्ड साईजचे २ फोटो.

रजिस्ट्रार

उपप्राचार्य

प्राचार्य